# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४

क्र.कोविमं/लेखा/नो.शु./२०२० /4944
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १५/९/२०२०

प्रति,

प्राचार्य व मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय: माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे सन २०२०-२१ साठी वार्षिक नोंदणी शुल्काबाबत.

संदर्भ: मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे यांचे क्रमांक रा.मं./लेखा-६/अंदाजपत्रक/नोंदणीशुल्क/३८१५, दिनांक ०७/९/२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांना कळविण्यात येते की, मंडळ विनियमानुसार दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झालेनंतर कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रचलित पध्दतीने नोंदणी शुल्क दिनांक १० ऑगस्ट पर्यंत नियमित दराने (विनादंड) स्विकारले जाते. परंतु सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावाने **सध्याची परिस्थिती पाहता सन २०२०-२१ मध्ये नोंदणी शुल्क नियमित दराने (विनादंड) दिनांक २० सप्टेंबर २०२० पर्यंत भरण्याबाबत मुदत वाढविण्यात आली आहे.** परंतु त्यापुढे नोंदणी शुल्क स्विकारण्याची कार्यवाही प्रचलित पध्दतीने (दंडासह) करण्यात येणार आहे. तरी याबाबतची नोंद सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांनी घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

15/09

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव: मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे